महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३५७ वा | दिनांक : ११/१२/२०२५ वार : गुरूवार

# मुंढवा प्रकरणात दोषींवरच कारवाई : मुख्यमंत्री फडणवीस



**मुंबई :** मुंढवा जमीन प्रकरणात कुणालाही वाचवण्याची सरकारची भूमिका नाहीये. जो दोषी असेल, त्याच्यावर कारवाई होणार आहे. त्यामुळे या संदर्भात आतापर्यंत केलेली कारवाई आणि पुढे काय कारवाई होणार याची सगळी माहिती आम्ही उच्च न्यायालयाला देऊ, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

महापालिका निवडणुकांच्या अनुषंगाने सुरू असलेल्या मतभेदावर देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारण्यात आला असता ते म्हणाले, महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने आम्ही एकत्र आहोत आणि एकत्र लढणार आहोत. आमच्यात काही राडा नाही काही रोडा नाही. एकनाथ शिंदे आमचे नेहमीच कौतुक करत असतात आणि मी देखील त्यांचे कौतुक करत असतो. आम्ही मित्रच आहोत आणि दिलखुलास मित्र आहोत.

मंगळवारी विधिमंडळाचे कामकाज सुरू असताना देवेंद्र फडणवीस यांनी भाजप आमदार अभिमन्यू पवार यांना झापले होते. यावर प्रतिक्रिया देताना फडणवीस म्हणाले, झापले हा शब्द वापरणे चुकीचे ठरेल. खरे म्हणजे काल अभिमन्यू पवार यांच्यावर अन्याय झाला. कारण ते बोलले वेगळं आणि मी ऐकलं वेगळं. त्याच्यापुर्वी कोणीतरी एका प्रकरणात लाडकी बहीण योजनेवर प्रश्न उपस्थित केला आणि म्हणून मी त्यावर बोललो होतो. त्यानंतर अभिमन्यू पवारांनी असे म्हटले होते की लाडक्या बहिणीचे पोरं ही अवैध दारूकडे जात आहेत आणि माझ्या ऐकण्यात वेगळे आले होते आणि म्हणून मी त्यावर आक्षेप घेतला आणि लाडक्या बहीणींवर बोलू नका असे म्हटले होते. त्यांनी योग्य मुद्दा मांडला होता, माझा गैरसमज झाला होता, असे स्पष्टीकरण फडणवीस यांनी दिले.

आरवीमध्ये काल ड्रग्सचा साठा सापडला होता. त्यानंतर पोलिसांनी यावर कारवाई केली. परंतु तिथले स्थानिक आमदार सुमित वानखेडे यांनी पोलिसांवर टीका केली होती. यावर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, सुमित वानखेडे मला देखील येऊन भेटले आणि निश्चितपणे याची अजून सखोल चौकशी करावी लागले. कारण इतक्या मोठ्या प्रमाणात ड्रग्सचा साठा त्या ठिकाणी सापडत असेल तर तिथले पोलिस ते नेमके काय करत आहेत हा प्रश्न निर्माण होतो जो वानखेडे यांनी उपस्थित केला आहे. यावर चौकशी केली जाईल, असे आश्वासन फडणवीस यांनी दिले आहे.

बिबट्याच्या वाढत्या हल्ल्यांवर प्रश्न विचारला असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, पहिल्यांदा तर जो काही बिबट आला होता तिथे आणि जो काही हल्ला झाला त्याबद्दल आमची सहवेदना आहे. बिबट्यांच्या वाढत्या प्रादुर्भावावर वनविभागाने काम सुरू केले आहे. जो जंगलातला बिबट आहे त्याच्यापेक्षा जो शेतात जन्माला आलेला बिबट आहे हा शहरात जास्त येत आहे. या बिबट्यांना पकडून रेस्क्यू सेंटरमध्ये नेले जाईल.

# जत नगरपालिका निवडणुकीला 'काळ्या जादू' चे ग्रहण



**सांगली :** राज्यातील नगरपालिका निवडणुकांसाठी २ डिसेंबर रोजी मतदान पार पडले असून, निकालासाठी २१ डिसेंबरपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे. या लांबलेल्या निकालामुळे उमेदवार आणि कार्यकर्त्यांची धाकधूक वाढलेली असतानाच, सांगली जिल्ह्यातील जत शहरात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. निवडणुकीच्या रणधुमाळीत चक्क उमेदवारांच्या नावाने अघोरी 'काळी जादू' करण्याचा प्रयत्न झाल्याचे समोर आल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

जत शहरातील निगडी रोडवरील प्रभाग क्रमांक ४ मधील रेणुका नगर भागात रस्त्यालगत हा संशयास्पद प्रकार आढळून आला. येथे हिरव्या रंगाचे कापड, एक मडके, दोन बाहुल्या, लिंबू, हळद-कुंकू आणि गुलाल अशा वस्तू टाकलेल्या होत्या. अधिक धक्कादायक बाब म्हणजे, या मडक्यामध्ये हिरव्या शाईने लिहिलेली प्रमुख पक्षांच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांची नावे आढळून आली. यामध्ये भाजपचे उमेदवार डॉ. रवींद्र आरळी, महाविकास आघाडीचे उमेदवार सुजय (नाना) शिंदे आणि शिवसेनेच्या शिंदे गटाचे सलीम गवंडी यांच्या नावांचा समावेश आहे.

याच ठिकाणापासून थोड्या अंतरावर दुसऱ्या एका हिरव्या कपड्यात आणखी एक मडके सापडले. त्यामध्ये प्रभाग ४ मधील चार महिला उमेदवारांची नावे होती. विशेष म्हणजे, या दुसऱ्या मडक्यामध्ये भाजपच्या महिला उमेदवाराचे नाव नव्हते, तर पहिल्या मडक्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार सुरेशराव शिंदे यांचे नाव आढळून आले नाही. विशिष्ट उमेदवारांची नावे वगळून इतरांच्या नावाने अशी अघोरी कृत्ये केल्याने शहरात तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

निवडणूक निकालाच्या प्रतीक्षेत ईव्हीएम स्ट्राँगरुमबाहेर कार्यकर्त्यांचा कडेकोट पहारा असताना घडलेल्या या प्रकाराने वातावरण तणावपूर्ण बनले आहे. ही काळी जादू कोणी आणि कोणत्या उद्देशाने केली, याचा पोलिसांनी तातडीने तपास करावा, अशी मागणी आता कार्यकर्त्यांकडून जोर धरू लागली आहे.

# महाराष्ट्रात भीक मागण्यावर बंदी येणार



**नागपूर :** राज्यात भीक मागण्यास प्रतिबंध घालणारे बहुचर्चित विधेयक मंगळवारी विधानसभेपाठोपाठ विधान परिषदेतही मंजूर करण्यात आले. मात्र, हे विधेयक मंजूर होताना सभागृहात प्रचंड गोंधळ उडाला. विधेयकातील त्रुटी, शीर्षकातील संदिग्धता आणि प्रशासनाच्या स्पष्टीकरणावर खुद्द तालिका सभापती नीलम गोऱ्हे यांच्यासह अनेक सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. दरम्यान, महिला अत्याचारांना आळा घालण्यासाठी राज्याने पाठवलेले 'शक्ती विधेयक' केंद्र सरकारने नाकारल्याची महत्त्वाची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात दिली.

राज्यात भीक मागण्यावर पूर्णपणे बंदी आणण्याच्या उद्देशाने हे विधेयक तयार करण्यात आले आहे. सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने आणि सार्वजनिक व्यवस्थेचे रक्षण करण्याच्या हेतूने हा कायदा गरजेचा असल्याचे सरकारचे मत आहे. मात्र, या कायद्यामुळे भिकाऱ्यांचे पुनर्वसन, त्यांच्या सुरक्षिततेची हमी आणि पर्यायी सहाय्य यांविषयी अनेकांनी प्रश्न उपस्थित केले आहेत.

महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी विधान परिषदेत 'महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध विधेयक' मांडले. मात्र, या विधेयकावरून सभागृहात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये संभ्रम निर्माण झाला. 'महारोगी' हा शब्द वगळण्यासाठी हे विधेयक आणले असले तरी, विधेयकाचे शीर्षक आणि त्यातील मजकूर यात ताळमेळ नसल्याचा आक्षेप ज्येष्ठ सदस्य एकनाथ खडसे यांनी नोंदवला.

शिवसेना आमदार मनीषा कायंदे, राष्ट्रवादीचे अमोल मिटकरी यांनीही विधेयकाबाबत असमाधान व्यक्त केले. विशेष म्हणजे, विधेयकासोबत दिलेल्या माहिती पुस्तिकेतील स्पष्टीकरणावर तालिका सभापती नीलम गोऱ्हे यांनीही नाराजी व्यक्त केली. तरीही गदारोळातच हे विधेयक मंजूर करण्यात आले. सदस्यांचे समाधान न झाल्याने आता या विषयावर शनिवारी विधान परिषद सभापतींच्या दालनात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

सदस्य असमाधानी असतानाही अंतिम निर्णय घेण्यात आल्यानंतर आता पुढील दिशा दाखवण्यासाठी सभापतींच्या दालनात शनिवारी महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत विधेयकातील विसंगती, सदस्यांच्या सूचना आणि पुढील प्रक्रिया यावर चर्चा होणार आहे. विधेयक मंजूर झाल्यानंतरही संबंधित बाबींचा पुनर्विचार करण्याची भूमिकाही काही सदस्यांनी मांडली आहे.

महिलांवरील अत्याचारांच्या घटनांना आळा घालण्यासाठी तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने मंजूर केलेले आणि केंद्राकडे पाठवलेले 'शक्ती विधेयक' केंद्र सरकारने नाकारले आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. तसेच, धर्मांतरण आणि लव्ह जिहादविरोधी कायद्यासंदर्भात पोलीस महासंचालकांच्या समितीचा अहवाल लवकरच प्राप्त होणार असून, त्यानंतर पुढील रूपरेषा ठरवली जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

दुसरीकडे, 'महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था विधेयका'वर दोन दिवस चाललेल्या चर्चेनंतर ते विधानसभेत मंजूर करण्यात आले. या चर्चेदरम्यान राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांना सत्ताधारी आणि विरोधी आमदारांनी प्रश्नांच्या सरबत्तीने घेरले होते. अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हस्तक्षेप करत उत्तरे दिल्यानंतर हे विधेयक मंजूर झाले.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ११ डिसेंबर २०२५

# यशासाठी शिस्त व कर्तव्यनिष्ठा महत्त्वाची - आयपीएस अपराजिता अग्निहोत्री



**कन्नड :** श्री. छत्रपती शिवाजी फार्मसी महाविद्यालय, कन्नड येथे शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठी डी.फार्मसी आणि बी.फार्मसीमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी भव्य समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून मा. अपराजिता अग्निहोत्री (IPS), सहाय्यक पोलीस अधीक्षक, कन्नड यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव मा. चंद्रकांत अण्णा देशमुख होते. यावेळी शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय एन. भोसले, उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर, डॉ. विजय मातकर यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल क्षीरसागर यांनी प्रास्ताविकातून नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करत महाविद्यालयातील उपक्रमांची माहिती दिली.यानंतर गेल्या शैक्षणिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न झाला. गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व प्रशस्तिपत्रके प्रदान करण्यात आली. प्रमुख पाहुण्या मा. अपराजिता अग्निहोत्री यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करत विद्यार्थी जीवनातील शिस्त, स्वअनुशासन, कर्तव्यनिष्ठा आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी यांवर विशेष भर दिला. फार्मसी क्षेत्रातील संशोधन, रोजगार संधी आणि तांत्रिक प्रगती याबाबतही त्यांनी मौल्यवान मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात मा. चंद्रकांतराव अण्णा देशमुख यांनी संस्थेचे ध्येय, शैक्षणिक उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांवर प्रकाश टाकला. आपल्या मनोगत डॉ. विजय एन. भोसले यांनी महाविद्यालयात राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली, तसेच पालकांचे उपस्थितीबद्दल कौतुक करून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यास शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास विद्यार्थी, पालक आणि प्राध्यापकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सूत्रसंचालन प्रा. कविता भामरे यांनी केले, तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. प्रवीण अकोलकर, प्रा. ढोणे, प्रा. काळे, प्रा. शिकारे, प्रा. पगारे, प्रा. ढाकरे, प्रा. मुळे आणि प्रा. देशमुख मॅडम यांचे विशेष सहकार्य लाभले.




# रोज दान केल्यास लवकरात लवकर होईल लक्ष्मीची कृपा



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** 'जे दोन हातांनी दान करतात,त्यांची झोळी विधाता हजार हातांनी भरतो. धन कमी होईल या भीतीने दान टाळू नका; उलट रोज दान करा, कारण दानाने लक्ष्मीची कृपा दुपटीने बरसते,' असे प्रतिपादन राष्ट्रसंत श्री ललितप्रभजी महाराजांनी केले. जिंतूर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मैदानावर आयोजित भव्य सत्संग प्रवचनात ते बोलत होते. हजारो भक्तांनी उपस्थिती लावलेल्या या कार्यक्रमात त्यांनी परोपकाराचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, 'परोपकारापेक्षा मोठे पुण्य नाही आणि पीडेपेक्षा मोठे पाप नाही. ते पुढे म्हणाले, 'डॉक्टरविना रुग्णालय, मूर्तीविना मंदिर, ब्रेकविना गाडी, पैशाविना पाकीट आणि पाण्याविना नदी जशी निरर्थक असते, तसे परोपकाराशिवाय जीवन निरर्थक आहे. श्रीमंतांनी सर्व मालमत्ता केवळ मुलांसाठीच राखू नये; जनतेसाठी काही दिले तर हजारो लोक कृतज्ञतेने आठवतील. यावेळी त्यांनी अन्नदान, वस्त्रदान आणि आवश्यक वस्तूंचे 'सात्त्विक आणि नवीन' दान करण्याचा संदेश दिला.

# कला केंद्रातील प्रेयसीकडून पैशांची मागणी ; विवाहित तरुणाची आत्महत्या



**धाराशिव :** कला केंद्रातील नर्तकीच्या प्रेमापायी गेवराई तालुक्यातील उपसरपंचाने स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या केल्याची घटना ताजी असतानाच आता पुन्हा एकदा असा प्रकार घडला आहे.धाराशिव तालुक्यातील येडशी येथून जवळच असलेल्या साई कला केंद्रातील नर्तकीकडून होत असलेली पैशांची मागणी आणि सततच्या भांडणाला कंटाळून विवाहित युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केली. हा प्रकार मंगळवारी (९डिसेंबर) पहाटे ४ वाजेच्या सुमारास घडला. विशेष म्हणजे मृताच्या चुलत बहिणीला नर्तकीनेच ही घटना कळवली.

अश्रुबा अंकुश कांबळे (२५, रुई - ढोकी, ता.धाराशिव) असे आत्महत्या केलेल्या युवकाचे नाव आहे. कांबळे मागील सहा महिन्यांपासून येडशीतील यशोदा स्टोन क्रेशरवर कामाला होता. क्रशरपासून काही अंतरावरील साई कला केंद्रातील नर्तकी पुजा ऊर्फ आरती धम्मपाल वाघमारे (रा. हरंगुळ, ता. जि. लातूर) हिच्याशी त्याचे प्रेम प्रकरण होते. पुजा आश्रुबासोबत नेहमी घरी येत होती. यामुळे आश्रुबा व त्याची पत्नी साक्षी हिचे भांडण होत असे. या कारणावरुन साक्षी माहेरी पुणे येथे गेली होती. आश्रुबा कांबळेव नर्तकी पूजा वाघमारे यांचेही पैशांच्या कारणावरुन सातत्याने भांडण होत असे.

पुजा वाघमारे ही आश्रुबाला नेहमी फोन करुन साई कला केंद्रावर बोलावून पैसे मागत होती. त्यामुळे आश्रूबाने घरातील सोने व पोस्टात भरलेली आरडी मोडली होती.सातत्याने नर्तकी पैसे मागत असल्यामुळे आश्रुबा कंटाळला होता.पत्नीही सोडून गेल्यामुळे तो निराश झाला होता. याच निराशेतून त्याने आत्महत्या केली. याप्रकरणी मृताचा चुलत भाऊ भारत कांबळे याने दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला. नर्तकी गायकवाड हिला अटक केली आहे. पुजाने आत्महत्येचा प्रकार पहाटेच मृताची बहीण छबुबाई यांना सांगितला. नंतर ही घटना उघड झाली. दरम्यान या गुन्ह्यात मृत अश्रुबा याला त्रास देणाऱ्यांमध्ये पूजा गायकवाडसोबत आणखी कोण आहे,याचा पोलिस शोध घेत आहेत. कलाकेंद्रातील आणखी कोण आश्रुबा आणि पूजा यांच्या संपर्कात होते, याची माहिती लवकरच पोलिस तपासातसमोर येणार आहे.

आश्रुबा कांबळे मागील तीन दिवसांपासून नर्तकी पुजा वाघमारेसोबत कारने (क्र.एमएच १४, एफएक्स २७७७) फिरत होता. विशेष म्हणजे नर्तकीच्या सांगण्यावरून आश्रूबा याने जुनी कार विकत घेतली होती. प्रवासात एकत्र असतानाच त्यांच्यात पैशाच्या कारणावरून भांडण झाले. त्यामुळे आश्रुबा याने साडीने चोराखळी शिवारातील सोनवणे कॉलेजकडे जाणाऱ्या कच्च्या रस्त्यालगत असलेल्या झाडाला गळफास घेतला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ११ डिसेंबर २०२५


## जिल्हा परिषद बहिरगाव शाळेच्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेसाठी निवड




**कन्नड (प्रतिनीधी)** : महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण महाऊर्जा यांच्या वतीने "ऊर्जा संवर्धन काळाची गरज" या विषयावर आयोजित चित्रकला व निबंध स्पर्धेत जिल्हा परिषद प्रशाला बहिरगाव शाळेने विभागीय स्तरावर उत्तुंग यश संपादन केले आहे.या स्पर्धेत शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून ऊर्जा बचतीचा संदेश प्रभावीपणे मांडत घवघवीत यश मिळवले चित्रकला स्पर्धेत शाळेतील विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे विभागात चमकदार कामगिरी केली. यामध्ये तेजश्री अमोल रावते, प्रथम क्रमांक ,कीर्ती सुनील जाधव द्वितीय क्रमांक, आणि विद्या रमेश बनकर तृतीय क्रमांकतसेच निबंध स्पर्धेत हर्षली योगेश जाधव हिने विभागातून द्वितीय क्रमांक मिळवत शाळेचा गौरव वाढविला.या सर्व विजेत्या विद्यार्थ्यांची निवड औंध, पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय चित्रकला व निबंध स्पर्धेसाठी झाली असून शाळेसाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे. या सर्व विद्यार्थ्यांना कलाशिक्षक सलीम आतार यांचे मार्गदर्शन लाभले या यशानिमित्त शाळेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब घोलप तसेच शिक्षक दिलीप महाजन, कुलभुषण व्यवहारे, राजेंद्र शिंपी, नुतन पवार , शाम खोसरे, सलिम आतार ,किरण पाटील, राधेशाम शर्मा, स्वप्नील गांगुडे, गणेश बल्हाळ, रविंद्र ठाकरे, किसनाबाई गोरे, सविता कुंटे यांनी आभिनंदन केले

## सुईबाई

सुईबाई सुईबाई
जो तो तुझे
गुण गाई

पानाफुलांचे
तोरण कर
सणासुदीला
सजव घर

बाळाचा सदरा
उसवून गेला
चल लवकर
लाग कामाला

दोऱ्यासोबत
तुझी ग जोडी
बोटाला टोचण्याची
करते खोडी

इवलासा जीव
करते किती काम
घेत नाही
कसलाच दाम




**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


## 'मांजा विकत नाही,' आयुक्तांसमोर सांगणाराच निघाला मांजा विक्रीचा मास्टरमाइंड





'आम्ही नायलॉन मांजा विकत नाही. तो ऑनलाइन पद्धतीने शहरात येतो. पोलिस विनाकारण आम्हाला त्रास देतात,' असे गाऱ्हाणे पोलिस आयुक्तांच्या बैठकीत मांडणाऱ्यानेच नायलॉन मांजा विकल्याचे छाप्यात उघड झाले. पोलिसांनी जिन्सी आणि सिटी चौक भागात छापेमारी करून नायलॉन मांजाचे १ लाख ५४ हजारांचे २०६ गट्टू जप्त करून ५ जणांवर गुन्हा दाखल केला. या बैठकीनंतर अवघ्या ५ तासांत छापा टाकला. बैठकीत तक्रारी मांडणारा मुदस्सीरच मांजा विक्रीचा मास्टरमाइंड असल्याचे समोर आले.

नायलॉन मांजामुळे ५ दिवसांपूर्वीच एका बालकाचा गळा चिरल्याची घटना घडल्यानंतर पोलिसांनी कारवाईला सुरुवात केली. त्यातच उच्च न्यायालयानेही सुनावल्यानंतर या कारवाईला वेग आला आहे. सोमवारी (८ डिसेंबर) पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी पतंग विक्रेत्यांची बैठक आयोजित केली होती. याच बैठकीत आरोपी मुदस्सीर याने गऱ्हाणे मांडले होते. पोलिसांनी २ ठिकाणी छापेमारी करून ५ जणांना अटक केली. शेख फरदीन अब्दुल रज्जाक (२२, रा. शहाबाजार), तालेब खान शेर खान (२८, रा. फातेमानगर, हर्सूलगाव), मुदस्सीर ऊर्फ मुजीब अहमद नजीर अहमद (४५, रा. आझम कॉलनी, रोशन गेट) अशी सिटी चौक भागात पकडलेल्या आरोपींची नावे आहेत. कफीलउल्ला खान फजलउल्ला खान (२८) आणि शेख मुशीर अहमद अश्फाक अहमद (१९, दोघे रा. शरीफ कॉलनी) यांना जिन्सीतून पकडले. आरोपींना न्यायालयाने एका दिवसाची पोलिस कोठडी सुनावली आहे, असे निरीक्षक गजानन कल्याणकर यांनी सांगितले.

उपनिरीक्षक अभिजित चिखलीकर यांच्या पथकाने शरीफ कॉलनी भागात छापा मारला. येथे कफीलउल्ला खान फजलउल्ला खान (२८) आणि शेख मुशीर अहमद अश्फाक अहमद यांच्या घरात मांजाचा साठा आढळला. त्यांच्याकडून ७ मांजाचे गट्टू जप्त केले. जिन्सी ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

शेख फरदीन हा बेकरीचालक असून पैशांसाठी त्याने मांजा विक्री सुरू केली. हर्सूलचा तालेब खान हा पतंगबाज असून त्याने फरदीनची मुदस्सीरशी भेट घालून दिली. मुदस्सीरने एका जणाकडून शहरात नायलॉन मांजा विक्रीसाठी आणला. नायलॉन मांजाच्या एका गट्टूची ९०० रुपयांना विक्री करण्यात येत होती. विश्वास बसल्यावरच, ओळख असलेल्या व्यक्तींनाच मांजा विकला जात होता. मुदस्सीर एकाच ग्राहकाला मोठ्या प्रमाणात मांजाचे गट्टू विकणे टाळत होता.

पनिरीक्षक अर्जुन कदम व राजेंद्र साळुंके यांच्या पथकाने शहाबाजार भागातील हिना पतंग दुकानात छापा मारला. येथून मुदस्सीर, शेख फरदीन अब्दुल रज्जाक आणि तालेब खान शेर खान यांना ताब्यात घेतले. फरदीनच्या घरातून तब्बल १९९ मांजाचे गट्टू जप्त केले. मास्टरमाइंड मुदस्सीर हा रेकॉर्डवरील आरोपी असून तो दरवर्षी मांजा विकतो. त्याच्याविरुद्ध मांजाविक्रीचे यापूर्वीच ५ गुन्हे दाखल आहेत. या तिघांविरुद्ध सिटी चौक ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.


**ADMISSION OPEN**

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903



**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ११ डिसेंबर २०२५

# युनिसेफ : बालहक्कांच्या जागतिक संरक्षणाची सामाजिक बांधिलकी

जागतिक पातळीवर मानवजातीच्या प्रगतीचा पाया हा मुलांच्या सर्वांगीण विकासात दडलेला आहे. बालक हे कोणत्याही समाजाचे वर्तमान आणि भविष्य घडवणारे घटक आहेत. परंतु वास्तवात पाहिले असता, या मुलांचे जीवन सर्वत्र समृद्ध, सुरक्षित किंवा संधी-संपन्न नाही. अनेक देशांमध्ये आजही मुलांवर कुपोषण, गरिबी, हिंसा, अत्याचार, बालमजुरी, बालविवाह, तस्करी, संघर्षस्थिती, शिक्षणाचा अभाव, आरोग्यसेवेतील असमानता आणि सामाजिक भेदभाव यांसारख्या गंभीर संकटांचे सावट आहे. अशा स्थितीत जगभरातील मुलांच्या संरक्षणासाठी, त्यांच्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी आणि बालहक्कांची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी कार्य करणारी सर्वात महत्त्वाची आणि प्रभावी जागतिक संस्था म्हणजे 'युनिसेफ (UNICEF - United Nations International Children's Emergency Fund)'. 11 डिसेंबर हा दिवस जागतिक पातळीवर 'युनिसेफ दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवशी केवळ संस्थेची स्थापना नव्हे, तर जगभरातील बालकल्याण, बालसुरक्षा आणि बालहक्कांसाठी केलेले बहुआयामी काम अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला जातो. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून युनिसेफचे कार्य हे केवळ मानवसेवा नसून सामाजिक परिवर्तनाची वाटचाल आहे, जिथे समता, न्याय, आरोग्य, शिक्षण, पोषण आणि संधी यांसारख्या सर्व मुलभूत मूल्यांचा जगभर प्रसार केला जातो. या दृष्टीकोनातून युनिसेफ दिनाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.

युनिसेफची स्थापना दुसऱ्या महायुद्धानंतर 11 डिसेंबर 1946 रोजी झाली. युद्धात उद्ध्वस्त झालेल्या युरोपीय मुलांच्या पुनर्वसनासाठी, त्यांना अन्न, औषधे आणि आरोग्यसेवा पुरवण्यासाठी हा निधी निर्माण करण्यात आला. कालांतराने त्याचे कार्यक्षेत्र मोठ्या प्रमाणावर विस्तारले आणि आज युनिसेफ 190 हून अधिक देशांमध्ये कार्यरत आहे. जगातील सर्व मुलांना समान संधी, सुरक्षित वातावरण, योग्य शिक्षण, आरोग्य, मानसिक-बौद्धिक विकास, हिंसेपासून संरक्षण आणि दारिद्र्याच्या चक्रातून मुक्त जीवन देणे हा युनिसेफचा मुख्य उद्देश आहे. युनिसेफचे कार्य समाजशास्त्रीयदृष्ट्या अनेक स्तरांवर पसरलेले आहे. समाजातील संरचनात्मक असमानता कमी करणे, दुर्बल गटांना व्यापक सामाजिक संरक्षण देणे, लैंगिक समानतेचा प्रसार, धोरणनिर्मितीवर प्रभाव, शाश्वत विकास उद्दिष्टांची पूर्तता, लोकसंख्यात्मक बदलाशी जुळवून घेणे, आणि समावेशक समाजरचनेची निर्मिती करणे हे सर्व त्यात येते.

भारतीय संदर्भात पाहिले असता, युनिसेफचे योगदान अतुलनीय आहे. भारत हा जगातील सर्वाधिक बालसंख्येचा देश आहे आणि बालकांची संख्या ही जवळपास 40 कोटींहून अधिक आहे. इतक्या मोठ्या आणि बहुविध सामाजिक-सांस्कृतिक संरचनेसह असणाऱ्या देशात मुलांच्या आरोग्य, पोषण, शिक्षण, समता आणि संरक्षणाशी संबंधित आव्हानेही मोठ्या प्रमाणावर आढळतात. युनिसेफने भारतात बालआरोग्य सुधारणा, कुपोषण निर्मूलन, बालमृत्यू दर घटविणे, माता-बाल स्वास्थ्य आणि सुरक्षित प्रसूती, मिशन इंद्रधनुषसारख्या लसीकरण मोहिमा, कोविड-19 दरम्यान आरोग्य पायाभूत सुविधांचे बळकटीकरण, स्वच्छ भारत अभियानासाठी जनजागृती, शाळाबाह्य मुलांचे शिक्षण, डिजिटल शिक्षणाची उपलब्धता, बालहक्क संवर्धन, बालविवाहविरोधी चळवळी, आणि बालमैत्रीपूर्ण न्यायव्यवस्था निर्माण करण्यासारख्या महत्त्वपूर्ण क्षेत्रात उल्लेखनीय काम केले आहे.

समाजशास्त्रीय दृष्टीने युनिसेफची सर्वात मोठी देणगी म्हणजे 'बालक हा स्वतंत्र मानवाधिकार असलेला व्यक्ती आहे' ही जाणीव. अनेक संस्कृतींमध्ये मुलांना आश्रित, आर्थिक ओझे किंवा कुटुंबातील लहान सदस्य समजले जात होते. परंतु युनिसेफ आणि संयुक्त राष्ट्रांच्या बालहक्क अधिवेशन (१९८९ - UNCRC) यांनी मुलांच्या चार प्रमुख हक्कांचे जागतिकीकरण केले, त्यामध्ये जीवनाचा हक्क, विकासाचा हक्क, संरक्षणाचा हक्क आणि सहभागाचा हक्क. या हक्कांमुळे मुलांना व्यक्तिमत्वस्वातंत्र्य, सुरक्षितता, शिक्षण, आरोग्य, अभिव्यक्ती आणि निर्णय प्रक्रियेत सहभाग यांचा अधिकार मिळाला. भारतानेही 1992 मध्ये या अधिवेशनावर सही केली आणि बालहक्कांच्या कायदेशीर-सामाजिक रक्षणासाठी विविध उपक्रमांची अंमलबजावणी सुरू झाली. परंतु केवळ कायदे किंवा उपक्रम पुरेसे नसतात. समाजातील असमानता, दारिद्र्य, जातीभेद, लिंगभेद, आर्थिक विषमता, ग्रामीण-शहरी दरी, आरोग्य पायाभूत सुविधांची कमतरता, शिक्षणातील असमानता, कुपोषणाची समस्या आणि एकूणच सामाजिक संरचनेतील दोष हे मुलांच्या विकासाला अडथळा आणतात. त्यामुळे युनिसेफचे कार्य केवळ आरोग्यसेवा किंवा शिक्षणपुरवठ्यापुरते मर्यादित राहत नाही, तर समाजाच्या संरचनात्मक मूलभूत समस्या समजून त्यावर उपाययोजना करण्यावर त्याचा भर असतो. उदा. मुलांमधील कुपोषणाच्या समस्येचा विचार केला तर ती फक्त अन्नाच्या कमतरतेची समस्या नाही; ती गरीबी, अज्ञान, मातांच्या आरोग्यस्थिती, स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा अभाव, अन्नसुरक्षेतील त्रुटी, सामाजिक रूढी, स्त्रियांचा सशक्तीकरणाचा अभाव, आणि ग्रामीण पायाभूत सुविधांची कमतरता या अनेक घटकांशी जोडलेली आहे. त्यामुळे युनिसेफ 'पोषण सुरक्षा' ही समग्र संकल्पना मांडतो, ज्यात अन्न, आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक जागरूकता हे सर्व घटक एकत्रितपणे कार्य करतात.

लैंगिक समानता हा युनिसेफच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा स्तंभ आहे. जगभरातील अनेक समाजांमध्ये मुलींचे शिक्षण, आरोग्य, पोषण आणि संरक्षण हक्कांना अजूनही सामाजिक अडथळे जाणवतात. बालविवाहाची प्रथा अद्यापही अनेक देशांत अस्तित्वात आहे. भारतात सुद्धा काही भागांमध्ये बालविवाहाचे प्रमाण आजही चिंताजनक आहे. युनिसेफ समाजशास्त्रीय पातळीवर अशी वर्तणूक बदलण्यासाठी 'कम्युनिटी लीडरशिप मॉडेल', 'महिला सक्षमीकरण कार्यक्रम', किशोरींमध्ये आरोग्य-जागृती, मासिक पाळी स्वच्छतेबाबत योग्य माहिती, जीवनकौशल्य शिक्षण आणि महिला नेतृत्व विकास यांसारख्या उपक्रमांच्या माध्यमातून मुलींच्या सर्वांगीण विकासाला चालना देते. यामुळे केवळ मुलींचे जीवनच बदलत नाही, तर संपूर्ण समाजातील मूल्यव्यवस्थाही बदलू लागते. बालमजुरी हा आणखी एक गंभीर सामाजिक प्रश्न. गरीबी, कर्जबाजारीपणा, शैक्षणिक संसाधनांचा अभाव, पालकांचे अल्प शिक्षण, सामाजिक दबाव, असंगठित अर्थव्यवस्था, आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे लाखो मुलांना आजही मजुरी करण्यास भाग पाडले जाते. अनेक मुलांना विषारी वातावरणात, कारखान्यांत, घरगुती किंवा अनियमित कामांमध्ये काम करावे लागते. युनिसेफ या समस्येचा अभ्यास केवळ आर्थिक दृष्टीने नाही तर समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून करते, जिथे बालमजुरी ही समाजातील संरचनात्मक असमानतेची लक्षणे आहेत, कारणे नाहीत. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय सुधारणांच्या माध्यमातूनच या चक्राला तोडता येते. म्हणूनच युनिसेफ शाळांमध्ये नावनोंदणी वाढविणे, शिक्षणाची गुणवत्ता सुधारणे, पालकांना जागरूक करणे, समुदायांमध्ये चर्चा निर्माण करणे आणि धोरणनिर्मितीवर प्रभाव टाकणे याकडे अधिक भर देतो.

समाजमाध्यमांचा प्रभाव, डिजिटल दरी, इंटरनेटवरील धोके, ऑनलाइन अत्याचार, सायबरबुलिंग, अश्लील सामग्री, व्यसन, चुकीची माहिती आणि मुलांच्या गोपनीयतेचा भंग या नवयुगातील नव्या सामाजिक समस्यांवरही युनिसेफ लक्ष केंद्रीत करते. डिजिटल युगातील बालसुरक्षेसाठी अनेक मार्गदर्शक तत्त्वे, धोरणे आणि जनजागृती अभियान चालवून मुलांना तंत्रज्ञानाचा सुरक्षित, सर्जनशील आणि शिकण्यासाठी उपयुक्त वापर करण्यास प्रोत्साहित केले जाते. युनिसेफच्या कार्याचा महत्त्वाचा पैलू म्हणजे आपत्कालीन किंवा युद्धपीडित मुलांना मदत करणे. जगातील अनेक संघर्षग्रस्त प्रदेशांमध्ये मुलांना विस्थापन, हिंसा, मानसिक आघात, अनाथत्व, तस्करी, शोषण आणि मृत्यूचा धोका असतो. युनिसेफ अशा प्रदेशांमध्ये त्वरित वैद्यकीय साहाय्य, स्वच्छ पाणी, अन्न, लसीकरण, निवारा, शिक्षण केंद्रे, मानसिक आरोग्य सहाय्य आणि कुटुंब पुनर्मिलनाची व्यवस्था करतो. समाजशास्त्रीयदृष्ट्या पाहता, युद्ध किंवा संघर्षग्रस्त समाजांमध्ये मुलांचे बालपण तुटते आणि पिढ्यान् पिढ्या चालणारे सामाजिक नुकसान निर्माण होते. अशा समूदायांना पुन्हा उभारण्यासाठी युनिसेफची आपत्कालीन मदत महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

भारतातील ग्रामीण व आदिवासी भागांमध्ये युनिसेफने आरोग्य, स्वच्छता, पोषण आणि शिक्षण या क्षेत्रांत दीर्घकालीन जनजागृती केली. कुपोषित मुलांसाठी पोषणवर्धिनी कार्यक्रम, अंगणवाडी सेवांचा विकास, मिशन इंद्रधनुषसारख्या मोहिमांना तांत्रिक मदत, सुरक्षित पाणी आणि स्वच्छता पद्धतींचे प्रशिक्षण, शालेय शिक्षण सुधारणा, बालविवाहविरोधी अभियान अशा अनेक उपक्रमांद्वारे युनिसेफने समाजातील सर्वात दुर्बल घटकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये मुलींची शाळेत उपस्थिती वाढविण्यासाठी 'किशोरी विकास कार्यक्रम', 'स्कूल बॅक टू कॅम्पेन', 'वॉश इन स्कूल्स' उपक्रम, पोषण सप्ताह, आरोग्य शिबिरे आणि जनजागृती मोहिमा मोठ्या प्रमाणात राबविण्यात आल्या आहेत. युनिसेफचे कार्य केवळ सेवाभावी स्वरूपाचे नसून संशोधनाधारित, डेटा-आधारित आणि वैज्ञानिक पद्धतीवर आधारित आहे. समाजशास्त्रातील 'स्ट्रक्चरल-फंक्शनलिझम', 'सिव्हिल सोसायटी पार्टिसिपेशन', 'कम्युनिटी डेव्हलपमेंट', 'सामाजिक बदल', 'कल्याणकारी राज्य' आणि 'मानवी विकास मॉडेल' या संकल्पनांचा वापर युनिसेफ आपल्या धोरणांमध्ये सातत्याने करतो. समाजातील प्रत्येक घटकाला मुलांच्या विकासात सहभागी करून समग्र सामाजिक परिवर्तन घडविण्याची त्यांची पद्धत इतर संस्थांसाठीही आदर्श आहे.

सध्याच्या काळात हवामान बदल (climate change) हा मुलांच्या अस्तित्वासाठी गंभीर धोका बनत आहे. पूर, दुष्काळ, चक्रीवादळे, रोगराई, हवा-पाणी प्रदूषण, अन्नसाखळीतील असुरक्षितता, स्थलांतर आणि आजारपण यामुळे मुलांचे जीवन अधिक धोक्यात येते. युनिसेफने 'क्लायमेट चेंज अँड चिल्ड्रेन' या शीर्षकाखाली अनेक अभ्यास करून जागतिक नेत्यांना बालहिताचे धोरण तयार करण्याचे आवाहन केले आहे. हवामान बदलामुळे मुलांवर होणारे परिणाम कमी करण्यासाठी ऊर्जा संक्रमण, पर्यावरण शिक्षण, पायाभूत सेवा निर्माण, पूरनियंत्रण व्यवस्था, हरित क्षेत्रांची निर्मिती आणि प्रादेशिक विकास या बाबतीतही युनिसेफ सक्रिय आहे. कोविड-19 महामारी हा 21व्या शतकातील सर्वात मोठा जागतिक संकटकाळ होता. या काळात मुलांच्या शिक्षणात व्यत्यय, ऑनलाइन शिक्षणातील असमानता, कुपोषण, मानसिक आरोग्य संकट, संक्रमण, आई-वडिलांच्या मृत्यूमुळे अनाथ झालेल्या मुलांचे संरक्षण, आणि आर्थिक अडचणी यांचा प्रचंड परिणाम झाला. युनिसेफने या काळात भारतासह अनेक देशांना ऑक्सिजन प्लांट, वैद्यकीय साहित्य, लसीकरण सामग्री, डिजिटल शिक्षणाची साधने, मानसिक आरोग्यसमर्थन, आणि आरोग्य-शिक्षण पायाभूत सुविधा उभ्या करण्यासाठी मोठे योगदान दिले. महामारीनंतरही मुलांच्या पुनर्वसनासाठी आणि शैक्षणिक नुकसान भरून काढण्यासाठी युनिसेफ सतत कार्यरत आहे.

युनिसेफ दिनाचे समाजशास्त्रीय महत्त्व असे की ते आपल्याला स्मरण करून देते की बालकांच्या विकासाचे प्रश्न हे केवळ कुटुंबाचे किंवा शिक्षणव्यवस्थेचे नसून संपूर्ण समाजाच्या संरचनेशी जोडलेले आहेत. मुलांसाठी सुरक्षित, समतामूलक आणि संधी-संपन्न वातावरण निर्माण करण्यासाठी राज्यव्यवस्था, स्वयंसेवी संस्था, समुदाय, कुटुंब, स्थानिक स्वराज्य संस्था, आरोग्यसेवा प्रणाली, शैक्षणिक प्रणाली, समाजमाध्यमे, उद्योगक्षेत्र आणि नागरिक या सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. आजच्या जगात तंत्रज्ञानातील प्रगती, आर्थिक विकास, ग्लोबलायझेशन, शहरीकरण, रोजगार संरचना, स्थलांतराचे वाढते प्रमाण, कौटुंबिक बदल, डिजिटल युगातील सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तन आणि जागतिक राजकारणातील अस्थिरता यांचा मुलांच्या जीवनावर थेट परिणाम होतो. त्यामुळे युनिसेफची भूमिका कालानुरूप अधिक महत्त्वाची बनत आहे. भविष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी मुलांना तयार करणे, त्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे, विविध सामाजिक-विकास कार्यक्रमांमध्ये त्यांचा सहभाग वाढविणे आणि हक्कसंरक्षणासाठी धोरणात्मक बदल घडविणे ही युनिसेफची दीर्घकालीन दिशा आहे. युनिसेफ दिनाचे औचित्य आपल्याला असेही सांगते की मुलांचे जीवन बदलण्याची क्षमता आपल्या हातात आहे. प्रत्येक नागरिक, पालक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते, प्रशासक, आरोग्यसेवक आणि समाजमाध्यम वापरकर्ते हे प्रत्येक जण या परिवर्तनाचा भाग बनू शकतात. मुलांशी संबंधित प्रत्येक निर्णय हा समाजाच्या दीर्घकालीन रचनेसाठी महत्त्वाचा असतो. समाजात समता, न्याय, समान संधी, आरोग्य, शिक्षण आणि सुरक्षेची हमी दिली तर पुढील पिढी अधिक सक्षम, शिक्षित, संवेदनशील आणि सशक्त होईल.

या सर्व विचारांचा सार असा की युनिसेफ दिन हा फक्त स्मरणाचा दिवस नाही तर तो सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणारा दिवस आहे. जगभरातील प्रत्येक मुलाला सुरक्षित, सन्मानजनक आणि संधींनी भरलेले बालपण मिळावे यासाठी आपण सर्वांनी एकत्र येणे आवश्यक आहे. बालक हा समाजाचा कणा आहे; त्याचे आरोग्य, शिक्षण आणि विकास हा संपूर्ण मानवजातीच्या प्रगतीशी जोडलेला आहे. म्हणूनच युनिसेफचे कार्य आणि तत्त्वज्ञान हे आजच्या काळात अधिक महत्त्वाचे, अधिक प्रासंगिक आणि अधिक आवश्यक बनले आहे. मुलांचे हक्क हेच मानवी हक्क आहेत आणि या हक्कांच्या संरक्षणासाठी युनिसेफ जगभरात आशेचा दीपवत कार्यरत आहे. 11 डिसेंबरचा युनिसेफ दिन हा या महान कार्याला सलाम करण्याचा तसेच पुढील प्रवासात अधिक बळकटपणा, अधिक सहकार्य आणि अधिक संवेदनशीलता निर्माण करण्याचा दिवस आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(समाजशास्त्राचे अभ्यासक)
मो. क्र. 9960103582
bagate.rajendra५@gmail.com